महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

विषय : राज्यात कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा दिनांक २३/०३/२०२० रोजीचा सामाजिक शास्त्रे पेपर -२ (भूगोल) विषयाची परीक्षा व त्यापुढील मंडळाच्या अन्य सर्व परीक्षा स्थगित केल्याबाबत

# प्र क ट न

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा वेळापत्रकानुसार दिनांक ०३ मार्च ते २३ मार्च २०२० पर्यंत मंडळामार्फत आयोजित करण्यात आली आहे.

त्यातील दिनांक २१ मार्च २०२० अखेरची लेखी परीक्षा संपन्न झालेली आहे. मात्र राज्यात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत खबरदारी घेण्यासाठी राज्यातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांना दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी जाहिर केल्यानुसार सोमवार, दिनांक २३ मार्च २०२० रोजी सकाळी ११.०० ते १.०० यावेळी आयोजित करण्यात आलेली सामाजिक शास्त्रे, पेपर-२ (भूगोल) या विषयाची लेखी परीक्षा व त्यापुढील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली कार्यशिक्षण विषयांची परीक्षा, आऊट ऑफ टर्नच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात ,येत आहेत.

सदर परीक्षांबाबतचे सुधारित नियोजन मंडळामार्फत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

दिनांक - २१/०३/२०२०

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४